माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ९७/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. गौतम ज्योतीरामजी आवळे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सदर विभाग, नागपूर शहर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त**
परिमंडळ क्र. २, सिताबर्डी, नागपूर शहर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २६.०७.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित (प्रतिनिधी)
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित (प्रतिनिधी)

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०८.०२.२०२१ | --- | १६.०६.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २७३६/२०१९ मध्ये दिनांक ०८.०२.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २६.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर शहर यांच्या तर्फे सहायक पोलीस निरीक्षक, श्री. देविदास चोपडे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त यांच्या तर्फे पोलीस उपनिरीक्षक, श्री. अमित देशमुख उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २७३६/२०१९ मध्ये दिनांक ०८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत दिनांक १७.०९.२०१९ रोजी अभिलेखावर उपलब्ध असलेल्या माहितीबाबत कळविले आहे. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही प्रथम अपील अर्जावार सुनावणी घेतांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर संयुक्तीक असल्याने अपील निकाली काढले आहे. सदर प्रकरणी अपीलार्थी यांनी माहिती अर्जात नमुद केलेली व्हीडीओ शुटींग करण्यात आलेली नसल्याने सदर माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे अपीलार्थीस विहीत मुदतीत कळविले आहे. तसेच मुद्दा क्र.२ मध्ये अपीलार्थी यांनी पोलीसांविरुध्द तक्रार करण्याच्या कार्यपध्दतीबाबत माहिती विचारली आहे. सदर मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरीही त्याबाबत अभिलेख स्वरुपात माहिती उपलब्ध असल्या माहिती पुरविणे आवश्यक आहे. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत सामान्य नागरीकांना तक्रार करावयाची असल्यास राज्य शासनाने राज्य पोलीस तक्रार प्रधिकरण गठीत केले आहे. सदर विभागाकडे नागरीक तक्रार करु शकतात. त्यामुळे मुद्दा क्र.२ बाबत अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस देणे आवश्यक ठरते. सबब, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

उपरोक्त विवेचनावरून प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात आले आहे."

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १६.०६.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील क्र. २७३६/२०१९ दिनांक ०८.०२.२०२१ रोजी पारित आदेशानुसार विशेषता मुद्दा क्र. २ ची माहिती अप्राप्त असल्याने तक्रार अर्ज दाखल केला. प्रस्तुत प्रकरणी मुद्दा क्र.२ मध्ये अपीलार्थी यांनी पोलिसांविरुध्द तक्रार करण्याच्या कार्यपध्दतीबाबत माहिती विचारली आहे. सदर मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरीही त्याबाबत अभिलेख स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यासमाहिती पुरविणे आवश्यक आहे. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत सामान्य नागरीकांना तक्रार करावयाची असल्यास राज्य शासनाने राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण गठीत केले आहे. सदर विभागाकडे नागरीक तक्रार करु शकतात. त्यामुळे मुद्दा क्र.२ बाबत अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस देणे आवश्यक ठरते असे आदेशित करून व्दितीय अपिल अर्ज निकाली काढले.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे मुद्दा क्र. २ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ च च्या व्याख्येत समावेश होत नाही. आयोगाचे व्दितीय अपिल आदेशाची दि. ०६.०७.२०२१ रोजी प्रत प्राप्त झाल्यानंतर मुद्दा क्र. २ बाबत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत सामान्य नागरिकांना तक्रार करावयाची असल्यास राज्यशासनाने राज्य पोलीस तक्रार प्राधीकरण गठीत केले आहे अशी माहिती पुरविण्यात आली असून सदर तक्रार दाखल करण्याकरीता परवानगीची आवश्यकता नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आले. तसेच याबाबत

कागदोपत्री कोणताच अभिलेख उपलब्ध नसल्याचे खुलासात नमूद केला. तसेच सादर खुलासा अपिलार्थी यांना देखील दिला आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जात मुद्दा क्र. २ शी संबधात पोलिस कर्मचारी यांच्याविरुध्द सामान्य नागरिकांनी तक्रार करावयाची असल्यास राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, महाराष्ट्र पोलीस यांच्या अधिकृत संकेस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. मुद्दा क्र. १ बाबत अपिलार्थी यांना दि. २४.०५.२०१७ ते दि. ३०.०५.२०१७ दरम्यान झिंगाबाई टाकळी सफीनगर भागात झालेल्या सभेची व्हिडीयो शुटिंग करण्यात आली नसल्याचे कळविले आहे. वरील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१), (ड), (छ) ,(ज) अन्वये उघड करणे जनमाहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. सर्वच सार्वजनिक कार्यक्रमाची व्हिडीओ शूटींग सुरक्षीतेच्या दृष्टीने संवेदनशील माहिती असून, न्यायीक प्राधिकरणाकडे सादर करावयाचे असल्याने सार्वजनिक दस्ताऐवजाचा भाग असला तरी ती माहिती उघड करणे बंधनकारक नाही, सबब, वरील वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २६.०७.२०२३

जा.क्र. 7314 दि. 29 DEC 2023